



# पारनेर दर्शन







वर्ष ४ अंक २, गुरुवार १२ फेब्रुवारी २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


## पुणे-अहिल्यानगर वंदे भारत, मेंटनन्स डेपोचा मुद्दा संसदेत

### खासदार नीलेश लंके यांनी वेधले लक्ष | रेल्वेमंत्र्यांकडून सकारात्मक संकेत

नवी दिल्ली : प्रतिनिधी

अहिल्यानगरपुणे दरम्यान वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करता नव्या वंदे भारत किंवा इंटरसिटी रेल्वे सेवेची आवश्यकता असल्याचा मुद्दा खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी संसदेत उपस्थित केला. यासोबतच वंदे भारत स्लिपर कोच, मेंटनन्स डेपो आणि स्थानिक बचत गटांना रेल्वे सेवांमध्ये प्राधान्य देण्यासंदर्भात त्यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. या सर्व मुद्द्यांवर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक निर्णयाचे संकेत दिले.




#### अहिल्यानगरपुणे दैनंदिन प्रवासाचा प्रश्न

खा. नीलेश लंके यांनी सांगितले की, महाराष्ट्रात सध्या २४ वंदे भारत रेल्वे सेवा कार्यरत आहेत. अहिल्यानगर हे मुंबई व पुणे जिल्ह्यांना जोडणारे औद्योगिक व ऐतिहासिक केंद्र असून, येथून हजारो विद्यार्थी व नोकरदार दररोज पुणे व मुंबईकडे ये-जा करतात. ही बाब लक्षात घेता अहिल्यानगर ते पुणे दरम्यान नवीन वंदे भारत किंवा इंटरसिटी सेवा सुरू करण्याबाबत सरकारचा विचार आहे का, असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

#### वंदे भारत स्लिपर कोच व लांब पल्ल्याच्या गाड्यांचा थांबा

रेल्वेमंत्र्यांच्या उत्तरात उल्लेख करण्यात आलेल्या वंदे भारत स्लिपर कोच संदर्भात खा. लंके यांनी प्रश्न उपस्थित केला. अहिल्यानगरहून दिल्ली किंवा जम्मू यांसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांवर नव्या स्लिपर गाड्या सुरू करून त्यांचा थांबा अहिल्यानगर येथे देण्याचा सरकारचा विचार आहे का, अशी विचारणा त्यांनी केली.

#### स्थानिक खाद्यपदार्थ व बचत गटांना संधी

रेल्वेतील खानपान सेवांमध्ये कोल्हापुरी, पनीर मुर्ग कोल्हापुरी, कांदा पोहे यांसारखे स्थानिक पदार्थ समाविष्ट केले जात असल्याचा उल्लेख करत, खानपान व इतर सेवांमध्ये महाराष्ट्रातील स्थानिक बचत गट आणि सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्यासाठी विशेष धोरण आखले जाणार का, याचीही मागणी खा. लंके यांनी केली.

#### महाराष्ट्रासाठी विक्रमी तरतूद

खा. लंके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, खा. लंके यांनी मांडलेल्या सूचनांची दखल घेण्यात आली असून त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल. महाराष्ट्रातील रेल्वे विकासासाठी यंदा २३ हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पूर्वीच्या सरकारच्या काळात राज्यासाठी केवळ १ हजार १०० कोटी रुपयांची तरतूद केली जात होती, असे त्यांनी नमूद केले.

#### मेंटनन्स डेपोची गरज

वंदे भारतसारख्या अत्याधुनिक रेल्वे सेवांची संख्या वाढत असताना त्यांच्या तांत्रिक देखभालीसाठी विशेष पायाभूत सुविधांची आवश्यकता असल्याचे खा. लंके यांनी अधोरेखित केले. अहिल्यानगर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे रेल्वे केंद्र असल्याने येथे वंदे भारतसाठी स्वतंत्र मेंटनन्स डेपो स्थापन करण्याचा विचार सरकार करत आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

#### क्षमता दुप्पट करण्याचे काम वेगात

मंत्री वैष्णव यांनी सांगितले की, सुमारे १ लाख कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प महाराष्ट्रात सुरू आहेत. औद्योगिक, शैक्षणिक आणि तंत्रज्ञान हब रेल्वेमार्गाने जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पुणे रेल्वे विभागाची क्षमता दुप्पट करण्याचे काम सुरू असून, राज्यातील इतर स्थानकांची क्षमताही वाढविण्यात येत आहे. नाशिक येथील कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रवासी क्षमतेचे नियोजन करण्यात आले असून, अहिल्यानगरमध्येही रेल्वेसंबंधी विविध कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी दिली.

## बौद्ध विहार मंजूरीसाठी खासदार लंके यांचा पाठपुरावा

### | केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याशी भेट | बौद्ध समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णयाचे आश्वासन

नवी दिल्ली : प्रतिनिधी

मतदारसंघातील बौद्ध समाजाच्या दीर्घकालीन धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक मागण्यांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी मंगळवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेतली. या भेटीत मतदारसंघातील बौद्ध विहार मंजुरीच्या विषयावर सविस्तर, सकारात्मक आणि आशादायी चर्चा झाली.



#### न्याय्य मागणी

मतदार संघातील बौद्ध समाजाची लोकसंख्या, त्यांची श्रद्धा, धार्मिक परंपरा तसेच सांस्कृतिक जडणघडण लक्षात घेता स्वतंत्र आणि सुसज्ज बौद्ध विहार उभारणी ही अत्यंत आवश्यक व न्याय्य मागणी असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी मंत्री आठवले यांच्या निदर्शनास आणून दिले. बौद्ध विहार केवळ धार्मिक उपासनेचे केंद्र न राहता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक संवर्धन, प्रबोधन आणि युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा मुद्दाही त्यांनी ठामपणे मांडला.

#### सकारात्मक चर्चा, आश्वासक भूमिका

या विषयावर रामदास आठवले यांनी अत्यंत सहानुभूतीपूर्वक भूमिका घेत प्रस्तावाचा सखोल विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, नियमांची पूर्तता आणि पुढील कार्यवाहीबाबत केंद्र शासनाच्या पातळीवर सहकार्य राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या चर्चेमुळे बौद्ध समाजाच्या अपेक्षांना नवी दिशा मिळाल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

#### आंबेडकरी विचारधारेचा वारसा जपण्याचा संकल्प

यावेळी खासदार नीलेश लंके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा उल्लेख करत समाजातील प्रत्येक घटकाला सन्मान, समता आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेच आपले राजकीय व सामाजिक ध्येय असल्याचे सांगितले. बौद्ध समाजाच्या धार्मिक व सामाजिक गरजांकडे केवळ मागणी म्हणून नव्हे, तर संविधानिक हक्काच्या दृष्टीने पाहिले पाहिजे, असा ठाम विचार त्यांनी मांडला.

#### सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न

मतदारसंघातील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक विकास या सर्व बाबींमध्ये समतोल साधत काम करण्याचा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला. बौद्ध विहार मंजुरीसाठी केलेला हा पाठपुरावा हा त्याच व्यापक विकासदृष्टीचा भाग असून, येत्या काळात बौद्ध समाजाच्या उन्नतीसाठी आणखी ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ही भेट आणि त्यातून झालेली सकारात्मक चर्चा बौद्ध समाजासाठी आश्वासक ठरणारी असून, लवकरच प्रत्यक्ष निर्णयाच्या दिशेने पावले पडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचे अचानक कामबंद आंदोलन

### बदनामीचा आरोप | शेकडो दिव्यांगांची गैरसोय

नगर : प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयात दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेवरून बुधवारी (११ फेब्रुवारी) डॉक्टरांनी अचानक कामबंद आंदोलन पुकारले. एका सामाजिक संघटनेकडून सातत्याने बदनामी होत असल्याचा आरोप करत डॉक्टरांनी नियमित दिव्यांग तपासणीवर बहिष्कार टाकला. या आंदोलनाचा फटका जिल्हाभरातून आलेल्या शेकडो दिव्यांग नागरिकांना बसला



असून दिवसभर प्रतिक्षा करूनही तपासणी न झाल्याने अनेकांची मोठी गैरसोय झाली.

जिल्हा रुग्णालयात दर बुधवारी दिव्यांगांची वैद्यकीय तपासणी करून प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया राबविली जाते. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिक या दिवशी रुग्णालयात येतात. अनेक शासकीय योजना, सवलती व लाभ मिळण्यासाठी हे प्रमाणपत्र अत्यावश्यक असल्याने तपासणीसाठी मोठी गर्दी होते. शेवटच्या रुग्णापर्यंत तपासणी केली जाते, असा डॉक्टरांचा दावा आहे.

मात्र, गेल्या काही

उर्वरीत पान ३ वर

## ७५७ ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीला स्थगिती

### उच्च न्यायालयाच्या आदेश | मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे निर्देश

नगर : प्रतिनिधी

जिल्ह्यातील ७५७ ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने त्या ठिकाणी प्रशासक नियुक्त करण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली होती. मात्र, या नियुक्तीप्रकरणी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिल्याने संबंधित ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही तात्पुरती थांबवण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सर्व पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांना प्रशासक नियुक्तीची कार्यवाही न करण्याचे आदेश दिले आहेत.



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नसल्याने राजकीय वातावरण तापले आहे. गट आणि गणातील इच्छुक उमेदवार निवडणुकांकडे डोळे लावून बसले आहेत. अशातच ७५७ ग्रामपंचायतींची मुदत संपल्यामुळे त्या ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांच्या माध्यमातून चालवण्याचा निर्णय

उर्वरीत पान ३ वर

## शहाजापुरात सुझलॉन कंपनीचे स्टोअर रूम फोडले

### अज्ञात चोरट्यांकडून २.३१ लाखांचा मुद्देमाल लंपास

सुपा : प्रतिनिधी

शहाजापूर येथील डोंगरावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प राबविणाऱ्या सुझलॉन कंपनीच्या स्टोअर रूमचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घरफोडीत चोरट्यांनी केबल, सीसीटीव्ही कॅमेरे, पाईप व इतर विविध साहित्य असा एकूण २ लाख ३१ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




यासंदर्भात कंपनीचे कर्मचारी नवनाथ शिवाजी सावंत यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सव्वासहा वाजण्यापासून ९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी स्टोअर रूमच्या शटरचे कुलूप तोडले. त्यानंतर स्टोअर रूममधील महत्त्वाचे

उर्वरीत पान ३ वर

## सुनेत्रा पवारांनी घेतली पंतप्रधान मोदी व गृहमंत्री शाह यांची भेट

### दिल्लीतील भेटींमुळे राजकीय वर्तुळात खळबळ



नवी दिल्ली : प्रतिनिधी

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. मंगळवारी रात्री उशिरा दिल्लीमध्ये दाखल झाल्यानंतर आज सकाळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्यासह पार्थ पवार, जय पवार, सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी प्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी रात्री उशिरा दिल्लीत दाखल होऊन भाजप नेतृत्वाशी चर्चा करून मुंबईला परतल्याची माहिती याआधीच समोर आली होती. या पार्श्वभूमीवर घडलेल्या सर्व भेटीगाठी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्यातील बदललेली राजकीय परिस्थिती आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांशी जोडून पाहिल्या जात आहेत. राज्यसभेच्या खासदार असलेल्या सुनेत्रा पवार या मध्यंतरीच्या घडामोडीनंतर प्रथमच दिल्लीत आल्याने या भेटींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी सुनेत्रा पवार आणि त्यांच्या दोन्ही पुत्रांनी सुमारे ४० मिनिटे सखोल चर्चा केली. त्यानंतर अमित शाह यांच्याशीही जवळपास अर्धा तास चर्चा झाल्याची माहिती

उर्वरीत पान ३ वर

## पळशीत बिबट्याचा दोघांवर प्राणघातक हल्ला

### नागपूरवाडीतील घटना | ग्रामस्थांमध्ये भीती | वनविभागाच्या दुर्लक्षावर संताप

पळशी : प्रतिनिधी :

तालुक्यातील पळशी नागपूरवाडी येथे मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दोन ग्रामस्थ गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांमध्ये तीव्र असुरक्षिततेची भावना पसरली आहे.



#### घराजवळच बिबट्याचा हल्ला

जखमींमध्ये दुर्योधन मेंगाळ व सचिन डुकरे यांचा समावेश आहे. दुर्योधन मेगाळ हे रात्री आपल्या घराजवळ असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. अचानक झालेल्या या हल्ल्यात मेंगाळ गंभीर जखमी झाले.

#### वनविभागावर सरपंचांचा रोष

या घटनेनंतर स्थानिक सरपंच प्रकाश राठोड यांनी वनविभागाच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ''या भागात बिबट्या फिरत असल्याची माहिती आम्ही यापूर्वीच दिली होती. पिंजरा लावण्याची मागणी करूनही वनविभागाने दुर्लक्ष केले. परिणामी आज ग्रामस्थांचे जीव धोक्यात आले,'' असा आरोप त्यांनी केला. वारंवार घटना घडत असतानाही ठोस उपाययोजना होत नसल्याची टीकाही त्यांनी केली.

#### वाढत्या हल्ल्यांमुळे भीतीचे सावट

तालुक्यात गेल्या काही काळात बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटना सातत्याने वाढत आहेत. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागात रात्री घराबाहेर पडणे जीवावर बेतत असल्याचे चित्र आहे. महिला, वृद्ध आणि लहान मुलांमध्ये प्रचंड भीती पसरली आहे.

#### मदतीला आलेल्यालाही इजा

दुर्योधन मेगाळ यांच्या आरडाओरडीतून मदतीसाठी धावून आलेले सचिन डुकरे यांच्यावरही बिबट्याने हल्ला केला. काही क्षणांतच बिबट्या अंधाराचा फायदा घेत जंगलाच्या दिशेने पसार झाला. मात्र तोपर्यंत दोघेही रक्तबंबाळ अवस्थेत कोसळले होते.

#### तातडीच्या उपाययोजनांची मागणी

घटनेनंतर ग्रामस्थांनी वनविभागाकडे तातडीने पिंजरा लावणे, बिबट्याचा शोध घेण्यासाठी नियमित गस्त वाढवणे, तसेच नागरिकांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे.

#### प्राथमिक उपचारानंतर नगरला हलविले

दोन्ही जखमींना तातडीने खडकवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र जखमांची तीव्रता लक्षात घेता पुढील उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

# मसूर दाळीत मिसळा तांदूळ, दही, मध...

## खोलवरची घाण अक्षरशः ओढून काढेल, चेहऱ्यावर आणेल चमक!

**प्रत्येकालाच आपली त्वचा चमकदार दिसावी असे वाटते. हे साध्य करण्यासाठी, ते त्यांच्या चेहऱ्यावर विविध उत्पादने आणि उपचार वापरतात. आता, तुमचा चेहरा किती आणि किती काळ चमकेल हे तुमच्या बजेटवर अवलंबून आहे. कारण एक सामान्य फेअरनेस क्रीम देखील तुम्ही लावता तोपर्यंत गोरी बनवते. ती वापरणे बंद करता तेव्हा पुन्हा आधीसारखा दिसायला लागतो. त्यामुळे ही उत्पादने वापरत राहावी लागतात. आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की तुम्ही तुमच्या त्वचेत कायमस्वरूपी चमक मिळवू शकता. जितकी घाण चेहऱ्यावर साचलेली आहे आणि चेहरा धुळीमुळे काळवंडलेला आहे. ती अक्षरशः खेचून बाहेर काढण्याचाही उपाय आहे. रसायनयुक्त उत्पादने तुमच्या त्वचेला हानी पोहोचवू शकतात. त्यामुळे नैसर्गिक अन् घरगुती उपाय अंमलात आणण्याचा सल्ला आम्ही देत आहोत.**





नैसर्गिक घरगुती उपाय तुम्ही वापरा. आम्ही जी रेसिपी शेअर करणार आहोत ती कंटेंट क्रिएटर प्रियांका रे यांनी तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर केली आहे. तिच्या व्हिडिओमध्ये, तिने स्पष्ट केले की तिच्या रेसिपीचा वापर केल्याने घाण आणि मृत त्वचेच्या पेशी निघून जातात. मसूर, तांदूळ, दही, मध हे घटक तिने घेतले. प्रथम मसूर आणि तांदूळ दोन्ही वेगवेगळ्या डब्यात रात्रभर भिजवा. नंतर, त्यांना मिक्सरमध्ये बारीक करून पेस्ट बनवा. आता, या पेस्टमध्ये दही आणि मध घाला. ते तुमच्या चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटे लावा. काढताना, तुमच्या बोटांना ओले करा आणि त्यांना गोलाकार हालचालीत घासून घ्या. यामुळे तुमचा चेहरा पूर्णपणे एक्सफोलिएट होईल. नंतर, तुमचा चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा आणि नंतर तुमच्या चेहऱ्यावर गुलाबजल लावा.

- मसूरचे फायदे : मसूर खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ते चेहऱ्यावर लावल्याने तुमची त्वचा सुंदर वाटते. त्यात नैसर्गिक व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. ते त्वचेला हळूवारपणे एक्सफोलिएट करते आणि उजळ करते. यामुळे मृत पेशी काढून टाकण्यास आणि मुरुम कमी करण्यास मदत होते, परिणामी रंग चमकदार होतो.
- तांदळाचे फायदे : हे लक्षात घेण्यासारखे आहे की तांदळात फेरुलिक ॲसिड असते, जे एक शक्तिशाली अँटीऑक्सिडंट असते. त्यात नैसर्गिक स्टार्च देखील असतो, जो त्वचेला आराम देतो. मॅट लूक देतो आणि रंग एकसारखा करतो. एकंदरीत, तांदूळ त्वचेच्या काळजीचा एक आवश्यक भाग आहे.
- दह्याचे फायदे : दह्यामध्ये प्रोबायोटिक-समृद्ध लॅक्टिक ॲसिड असते, जे त्वचेला खोलवर हायड्रेट करते. ते पिगमेंटेशन कमी करण्यास मदत करते. याव्यतिरिक्त, त्वचेला हायड्रेट करण्यास मदत करते. ते ओलावा टिकवून ठेवते आणि त्वचा नैसर्गिकरित्या चमकदार दिसते.
- मधाचे फायदे : मध त्वचेच्या काळजीचा एक महत्त्वाचा भाग आहे. ते त्वचा मऊ आणि चमकदार बनवू शकते. ते त्वचा निरोगी आणि मॉइश्चरायझ ठेवते. ते तुमचा नैसर्गिक रंग उजळण्यास देखील मदत करते.





# मुलतानी मातीने मुरुमांपासून मुक्ती?

**मुलतानी माती ही त्वचेच्या काळजीचा एक अतिशय महत्त्वाचा भाग मानली जाते. जेव्हा जेव्हा फेस मास्क किंवा स्क्रबचा विचार येतो तेव्हा लोक त्यात नेहमीच मुलतानी माती मिळवतात. जेव्हा लोकांना दुसरे काहीही सापडत नाही, तेव्हा ते फक्त मुलतानी माती ओली करतात आणि त्वचेची काळजी घेण्याच्या नावाखाली चेहऱ्यावर लावतात. यामुळे प्रश्न निर्माण होतो, की मुलतानी माती खरोखर फायदेशीर आहे का ? आपण सर्वजण असा विश्वास ठेवतो की नैसर्गिक काहीही आरोग्यदायी आहे आणि आपल्याला किंवा आपल्या त्वचेला हानी पोहोचवत नाही. पण हा विश्वास नेहमीच खरा नसतो. असे नाही की आपण मुलतानी मातीला आपल्या त्वचेसाठी हानिकारक म्हणतो, कारण प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात...**

- डॉक्टरांनी सत्य उघड केले : मुलतानी मातीचे दोन्ही पैलू समजून घेणे आणि ती योग्यरित्या कशी वापरावी हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा प्रकारे, आपण त्वचेचे नुकसान टाळू शकतो. खरं तर, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की अनेक प्रकरणांमध्ये, मुलतानी माती वापरल्याने त्वचा सुधारत नाही, उलट ती खराब होते. बरेच लोक ओल्या मुलतानी मातीला मुरुमांवर किंवा चेहऱ्यावरील मुरुमांवर लावतात. त्यांचा असा विश्वास आहे की मुलतानी माती हा मुरुमांवर सर्वोत्तम उपाय आहे. त्वचारोगतज्ञांकडून जाणून घेऊ मुलतानी माती मुरुमांपासून मुक्त होण्यास मदत करू शकते का.
- मुरुमांवर कसे कार्य करते ? : त्वचारोग तज्ञांच्या मते, मुलतानी माती चेहऱ्याला उजळवते आणि मृत पेशींना काढून टाकते. तथापि, मुरुमांवर थेट लावल्याने ते पूर्णपणे काढून टाकता येत नाही. मुरुम-प्रवण आणि तेलकट त्वचेसाठी ते फायदेशीर आहे, परंतु ते मुरुमांना कमी करणार नाही. केवळ मुलतानी माती मुरुमांवर उपचार करू शकत नाही. जर तुम्ही मुरुमांवर उपचार घेत असाल, तर तुमच्या चेहऱ्यावर मुलतानी माती वापरणे टाळा. त्यामुळे स्थिती आणखी बिघडू शकते.
- मुलतानी माती चेहऱ्यावर लावण्याचे फायदे : उपलब्ध माहितीनुसार, मुलतानी माती चेहऱ्यावर लावल्याने त्वचेवरील अतिरिक्त तेल आणि घाण काढून छिद्रे साफ होतात. यामुळे मुरुमे आणि ब्लॅकहेड्स कमी होऊ शकतात. ही माती चेहरा थंड करते आणि त्वचेची जळजळ शांत करते. त्यात नैसर्गिक खनिजे असतात जी त्वचेला उजळवतात आणि रंग सुधारतात.

### मुलतानी माती कशी वापरावी ?

मुलतानी माती ७० ते ८०% सुकेपर्यंत तुमच्या चेहऱ्यावर ठेवावी. त्यानंतर, पाण्याने स्वच्छ धुवा. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की तुमचा चेहरा उजळवण्यासाठी मुलतानी माती पूर्णपणे सुकू देऊ नये. जर तुम्ही ती पूर्णपणे सुकल्यानंतर काढली तर तुमच्या चेहऱ्यावर वृद्धत्वाची चिन्हे दिसू शकतात. शिवाय, तुम्ही ती फक्त एकदाच वापरावी. तुम्ही कधीही एकापेक्षा जास्त वेळा मुलतानी माती लावू नये. एकूणच, तुम्ही चेहऱ्याच्या समस्यांसाठी मुलतानी माती वापरू शकता, परंतु ती केवळ मुरुमांवर काम करणार नाही.



# चमकदार त्वचेचा स्लगिंग ट्रेंड काय आहे?

**दिल्लीत जन्मलेली मीरा राजपूत तिच्या सौंदर्याने, शैलीने आणि व्यक्तिमत्त्वाने सर्वांना मोहीत करते. बॉलिवूडचा चॉकलेट बॉय शाहिद कपूरही तर तिच्यावर असा लट्टू झाला, की तिला जन्मोजन्माची साथी बनवले. मात्र आज लोक मीराला फक्त शाहिद कपूरची पत्नी म्हणून पाहत नाहीत, तर तिने बॉलिवूड आणि देशात स्वतःसाठी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. लोक अनेकदा तिला विचारतात, की तिच्या विनाडाग आणि चमकदार त्वचेचे रहस्य काय आहे. प्रत्येक स्त्रीला मीरासारखे सुंदर दिसायचे आहे. मीराच्या सौंदर्याचे रहस्य काय आहे ते जाणून घेऊया...**

## मीरा इतकी सुंदर कशी दिसते ?

मीरा राजपूतने एका मुलाखतीत सांगितले, की ती तिच्या त्वचेची काळजी घेण्यासाठी दररोज रात्री स्लगिंग करते. स्लगिंग हा एक स्किनकेअर ट्रेंड आहे; या ट्रेंडचे अनुसरण करण्यासाठी तुम्हाला तुमच्या रेफ्रिजरेटरमधून फक्त एक गोष्ट हवी आहे. ती चेहऱ्यावर लावल्याने तिची त्वचा सुधारते. आता, स्लगिंग म्हणजे काय आणि त्याचा त्वचेला फायदा होतो का ते जाणून घेऊया...



- स्लगिंग म्हणजे काय ? : स्लगिंग हा स्किनकेअर ट्रेंड कोरियामध्ये उगम पावला आणि हळूहळू जगभरात पसरत आहे. हा ट्रेंड समजून घेण्यासाठी स्लगिंगमध्ये रात्रीच्या वेळी संपूर्ण चेहऱ्यावर पेट्रोलियम जेलीचा जाड थर लावणे समाविष्ट आहे. ते रात्रभर लावून ठेवून सकाळी ते काढून टाकायचे. हे त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे त्वचा चमकदार होते. लोकांचा असा विश्वास आहे, की स्लगिंगमुळे त्वचा खोलवर हायड्रेट होते आणि ओलावा टिकून राहण्यास मदत होते.
- डॉक्टरांनी काय म्हटले ? : डॉक्टरांच्या मते, चमकदार चेहरा मिळविण्यासाठी तुम्ही कोणत्याही ट्रेंडचे आंधळेपणाने अनुसरण करू शकत नाही. त्वचारोगतज्ञ प्रियांका रेड्डी यांनी एका व्हिडिओमध्ये सांगितले की स्लगिंग ट्रेंड प्रत्येकाच्या त्वचेसाठी योग्य नाही. शिवाय, चेहऱ्यावर पेट्रोलियम जेली लावल्याने त्वचेला गंभीर नुकसान होऊ शकते. पेट्रोलियम जेली चेहऱ्याभोवती बांधलेल्या प्लास्टिकच्या पिशवीसारखे काम करते. ज्यामुळे त्वचेला श्वास घेण्यापासून रोखले जाते आणि छिद्र बंद होतात. म्हणून, रात्री पेट्रोलियम जेली लावणे टाळावे.
- ट्रेंड प्रत्येकाच्या त्वचेसाठी चांगले नाही : आपल्या सर्वांच्या त्वचेचे प्रकार खूप वेगळे आहेत. जर मीरा राजपूत किंवा इतर सेलिब्रिटी या उपचारांचा वापर करत असतील आणि फायदे अनुभवत असतील, तर याचा अर्थ असा नाही की तुम्ही ते तुमच्या चेहऱ्यावर आंधळेपणाने वापरून पहावे. वेगवेगळ्या त्वचेचे प्रकार आहेत. जर तुमची मुरुमांची समस्या किंवा तेलकट त्वचा असेल, तर तुमच्या चेहऱ्यावर पेट्रोलियम जेली लावल्याने गंभीर समस्या उद्भवू शकतात.

# धूळयुक्त पंखा करा एका रुपयात स्वच्छ

## शिडी किंवा स्टूलचीही गरज नाही...

**धूळ आणि घाणीने झाकलेला पंखा केवळ घराचे स्वरूपच खराब करत नाही तर हवेच्या गुणवत्तेवरही परिणाम करतो. पंख्याची वारंवार साफसफाई करणे कठीण आहे आणि दीर्घकाळ दुर्लक्ष केल्याने घाण साचत राहते. छताच्या पंख्यापर्यंत पोहोचण्यासाठी अनेकदा शिडी किंवा स्टूलची आवश्यकता असते. तथापि, आता ही इतकी त्रासदायक गोष्ट राहणार नाही... एक सोपी घरगुती पद्धत आम्ही तुम्हाला सांगतो. पद्धत फक्त १ रुपयात आणि घरगुती साधनांनी तुमचा पंखा चमकू शकते. दिवाळीच्या स्वच्छतेमध्ये कोणतीही समस्या टाळण्यासाठी, ही पद्धत लक्षात ठेवा. जेणेकरून तुम्ही तुमचा पंखा नियमितपणे स्वच्छ करू शकाल.**

- सर्वात आधी : पंखा साफ करण्यापूर्वी, सैल धूळ काढून टाका. पंख्यावर जमा झालेली जाड धूळ आणि जाळे साफ करण्यासाठी झाडू वापरा. झाडूचे लांब हँडल तुम्हाला पंख्यापर्यंत पोहोचण्यास मदत करते, ज्यामुळे शिडी चढण्याची गरज नाहीशी होते. धूळ काढून टाकल्याने पुढील साफसफाईचे काम सोपे होते.
- घरगुती क्लिनर बनवा : कोमट पाण्यात अँटासिड पावडर (ईनो) चे एक पॅकेट मिसळा आणि एक रुपयाचा शॅम्पू सॅशे घाला आणि पूर्णपणे मिसळा. अँटासिड पावडरमधील सायट्रिक ॲसिड आणि सोडियम बायकार्बोनेट, शॅम्पूच्या डिटर्जंट गुणधर्मांसह एकत्रितपणे एक शक्तिशाली फोमिंग सोल्यूशन तयार करतात. हे द्रावण स्प्रे बाटलीत ओता. हे द्रावण पंख्यावरील तेलकट आणि चिकट घाण सैल करते आणि सैल करते, ज्यामुळे ते साफसफाईसाठी तयार होते.
- साफसफाईची साधने : हँडलवाला स्क्रबर घ्या आणि प्लास्टिकच्या बाटलीचे झाकण कापून टाका. कापलेल्या झाकणाला दोन छिद्रे करा आणि स्क्रबरच्या हँडलला वायरने बांधा. झाकण वरच्या दिशेने असावे. कारण तेथे एक लांब पाईप किंवा रॉड जोडला जाईल. हे घरगुती साधन पंख्याच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचण्यासाठी आणि ते घासण्यासाठी योग्य आहे; तुम्हाला शिडी, स्टूलची आवश्यकता नाही.
- स्वच्छता कशी करावी ? : प्रथम, तयार केलेले द्रावण पंख्याच्या ब्लेडवर फवारून घ्या आणि ते काही वेळ घाणीवर राहू द्या. आता, पाईपला स्क्रबर लावलेल्या टूलचा वापर करा आणि पंख्याच्या ब्लेड हलक्या हाताने घासून घ्या. लांब हँडलमुळे तुम्ही जमिनीवर उभे राहून पंख्याचा मध्यभाग देखील स्वच्छ करू शकता.
- शेवटी पुसून टाका आणि चमकवा : अंतिम साफसफाईची पायरी म्हणजे पंखा चमकदार आणि डागरहित करण्यासाठी पुसणे. स्क्रबिंग केल्यानंतर, स्क्रबर टूलला स्वच्छ, कोरडे कापड घट्ट बांधा. पंख्याचे ब्लेड हळूवारपणे पुसण्यासाठी कापडाचा वापर करा. हे पंखा स्वच्छ करेल, चमकवेल आणि नवीनसारखे दिसेल.

# होमवर्क करण्यास टाळाटाळ करतेय मुलगा ? शिका ३ गोल्डर रूल



**काही मुले गृहपाठ वेळेवर पूर्ण करतात, परंतु काही पालकांना त्यांच्याकडून गृहपाठ करवून घेणे अवघड जाते. यामुळे अनेकदा शाळेतून तक्रारी येतात. पालक प्रशिक्षक पुष्पा शर्मा यांनी ही समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाचे नियम सांगितले आहेत.**

इंस्टाग्राम व्हिडिओमध्ये, पालक प्रशिक्षक पुष्पा शर्मा म्हणतात की जेव्हा तुमचे मूल गृहपाठ करण्यास नकार देते तेव्हा पालकांनी तीन महत्त्वाचे नियम पाळावेत. यामुळे मुलाचे नाही हे हो मध्ये बदलण्यास मदत होऊ शकते.

- मुलाचा दृष्टिकोन समजून घ्या : तज्ञ पुढे स्पष्ट करतात की पालकांनी प्रथम त्यांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकले पाहिजे. नंतर, अगदी शांतपणे म्हणा, ठीक आहे, जर तुला आता गृहपाठ करायचे नसेल तर ते ठीक आहे...
- थोडा वेळ थांबा आणि नंतर परत जा : प्रशिक्षक शिफारस करतात की पालकांनी थोडा वेळ थांबावे आणि त्यांच्या मुलाकडे परत जावे, त्यांच्या डोळ्यात पहावे आणि प्रेमाने विचारावे, तुम्ही हे १० मिनिटांत कराल की आता फक्त २ मिनिटांत ?
- छोट्या टप्प्यात समजावून सांगा : तिसरा नियम म्हणजे अशा प्रकरणांमध्ये लहान पावले उचलणे. तुमच्या मुलाला प्रोत्साहनदायक स्वरात सांगा, चला, आधी फक्त दोन प्रश्न सोडवा किंवा अर्धा अध्याय वाचा, मग तुम्हाला तुमच्या अभ्यासादरम्यान २० मिनिटे मोकळा वेळ मिळेल. शिक्षक स्पष्ट करतात की जेव्हा मुलाला नियंत्रण आणि सांत्वन दोन्ही मिळते तेव्हा ते नाही वरून हो कडे लवकर वळतात. म्हणून, पालक निश्चितपणे ही पद्धत वापरून पाहू शकतात.

## शॉर्ट न्यूज

### तीन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

■ **शेवगाव :** तालुक्यातील चापडगाव माथा शिवारात जुन्या वादातून झालेल्या खुनाच्या प्रकरणात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने तीन संशयित आरोपींना दोषी ठरवले आहे. जालिंदर आसाराम गायके (वय ५०), बाळासाहेब आसाराम गायके (वय ४६) आणि तुकाराम ज्ञानदेव गायके (वय ४२) या तिघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या खटल्यात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अर्जुन. बी. पवार यांनी सरकारी पक्षाची बाजू मांडली.

### चारचाकी फोडून ऐवज लंपास

■ **श्रीरामपूर :** शहरात घरासमोर उभी केलेली चारचाकी गाडी फोडून अज्ञात चोरट्याने गाडीतील सीएनजी किट, जॅक, स्टेपनी आणि टायर असा एकूण ७, ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. आंबादास भिकाजी उदमले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने गाडीच्या मागील दरवाजाची काच फोडून आत प्रवेश केला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### घरफोडीतील आरोपी जेरबंद

■ **पाथर्डी :** स्थानिक गुन्हे शाखेने १० वर्षांपासून घरफोडीच्या गुन्ह्यात फरार असलेल्या मिनीनाथ भवरे (वय ३५) याला पाथर्डी तालुक्यातील घाटशिरस येथून अटक केली. फरार आरोपींची माहिती गोळा करण्याच्या जबाबदारीवर असलेल्या पथकाने भवरेच्या घराचा पत्ता मिळवून त्याला ताब्यात घेतले. पाथर्डी पोलीस स्टेशनच्या अभिलेखात हा गुन्हा नोंद आहे.

### चारचाकीची दुचाकीला धडक

■ **कर्जत :** अहिल्यानगर-सोलापूर महामार्गावर कर्जत तालुक्यातील कोकणगाव शिवारात एक भीषण अपघात झाला. एका फोर व्हीलरने दुचाकीला धडक दिल्यानंतर, फोर व्हीलर चालकाने वाहन न थांबवता दुचाकी काही अंतरापर्यंत फरफटत नेली. या धक्कादायक घटनेची माहिती मिळताच मिरजगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त दोन्ही वाहने मिरजगाव पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आली आहेत.

### अल्पवयीन मुलाचे अपहरण

■ **अहिल्यानगर :** शहरातील सक्कर चौक परिसरातून एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार, तिचा मुलगा अहिल्यानगरमध्ये असताना त्याला अज्ञात व्यक्तीने पळवून नेले. ही घटना पुणे जिल्ह्यातील चाकण तालुक्यातील रहिवासी असलेल्या आईसाठी धक्कादायक आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# शिक्षक समायोजनापूर्वी तात्काळ पदोन्नत्या करा

**। शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले यांची मागणी**
**। मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा**



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**शासनाच्या धोरणानुसार व सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद अंतर्गत टीईटी पात्रता परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांमधून तात्काळ विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षकांच्या पदोन्नत्या शिक्षक समायोजनापूर्वी करण्यात याव्यात, जेणेकरून अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन करताना दिलासा मिळेल अशी आग्रही मागणी राज्य संघाचे उपनेते रावसाहेब रोहोकले यांनी केली .यासंदर्भात नुकतीच मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, मुख्यालेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे यांच्या समवेत बैठक पार पडली .**

पदोन्नती माहिती संकलन करायचे काम जिल्हा स्तरावरून सुरू असून त्यात बहिस्थ पद्धतीने शिक्षण घेतलेल्या परंतु कार्यालयीन परवानगी नसलेल्या शिक्षकांना पदोन्नती प्रक्रियेतून वगळले जाण्याची शक्यता निर्माण झाली होती .या संदर्भात रोहोकले गुरुजी यांची बहिस्थ पद्धतीने शिक्षण घेतलेल्या शिक्षकांना वगळण्यात येणार नाही ही विनंती मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी मान्य केली.

त्यासाठी अशा सर्व बहिस्थ शिक्षण घेतलेल्या शिक्षकांचे कार्योत्तर परवानगी प्रस्ताव लवकरच तालुकास्तरावर मंजूर केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली .यामुळे वरिष्ठ शिक्षण घेतलेल्या सर्व शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे .त्याचबरोबर सध्या आलेल्या अंतिम संचमान्यतेमध्ये खूप त्रुटी असून सदर त्रुटींची तात्काळ राज्य पातळीवरून दुरुस्ती करण्यात यावी यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सकारात्मकता दर्शवून राज्य पातळीवरून त्रुटींची दुरुस्ती झाल्यानंतरच समायोजन प्रक्रिया राबवली जाईल असा दिलासा दिला .

याचबरोबर निवड श्रेणी मंजूरीसाठी जिल्हास्तरावरून पाच टीम तयार करून त्याचा निपटारा केला जाईल, जिल्हा क्रीडा स्पर्धेमध्ये यशस्वी झालेले कर्मचारी व विद्यार्थी यांना सन्मानित करण्यात यावे,एम एच टी सी इ टी नसलेल्या शिक्षकांचे कपात केलेली रक्कम संबंधितांना पुन्हा देण्यात यावी . आदी मागण्या मांडण्यात आल्या समवेत कार्यकारी अध्यक्ष भास्कर नरसाळे, विकास डावखरे उपस्थित होते .

# देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम म्हणजे काला

**रामायणाचार्य समाधान महाराज शर्मा यांचे प्रतिपादन**



**सोनई : प्रतिनिधी**

**देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम म्हणजेच काला असल्याचे प्रतिपादन रामायणाचार्य समाधान महाराज शर्मा यांनी केले. नेवासा तालुक्यातील शिरसगांव येथे श्री सद्गुरू गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवातील काल्याच्या कीर्तनात ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले, माजी आमदार नरेंद्र घुले, माजी पंचायत समिती सभापती सुनिता गडाख, आयोजक प्रा. गणेश देशमुख यांच्या हस्ते समाधान महाराजांचा सन्मान करण्यात आला.**

शर्मा महाराज पुढे म्हणाले, दहीभात व लाह्यांचा काला हा केवळ महाप्रसाद नसून त्याचा आनंद भूतलावर मानव देहातच अनुभवता येतो. म्हणूनच स्वर्गातील देवांनाही काल्याचा प्रसाद मिळावा यासाठी मृत्युलोकात जन्म घ्यावा वाटतो, असे त्यांनी सांगितले. देव जवळ असला की आनंद मिळतो. भगवान श्रीकृष्ण गोकुळवासीयांसोबत असल्याने संपूर्ण गोकुळ आनंदी होते.

सप्ताहाच्या सांगतेनिमित्त दिंडी मिरवणुकीस प्रारंभ झाला. संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात आली. सडा-रांगोळीने परिसर सुशोभित करत नागरिकांनी या मिरवणुकीचे स्वागत केले. टाळ, मृदंग, सनईच्या निनादात 'ज्ञानोबा तुकोबा' व 'गजानन महाराज की जय'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमास रवी देशमुख, गणेश गव्हाणे, अशोक मिसाळ, सुनील काकडे, डॉ. नारायण म्हस्के, रोहिदास लंघे, सरपंच अझर शेख, दत्तात्रय पोटे, पांडुरंग गणगे, सुनील नजन, बबन तांबे आदी उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

# ह.भ.प. इंदुरीकर महाराजांना विनंती



**ह.भ.प. इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनाला महाराष्ट्रभर भरभरून प्रतिसाद आणि प्रसिद्धी मिळत आहे. मीही त्यांची गावरान बाजाची कीर्तने यूट्यूबवर ऐकतपाहत असतो. खरे तर महाराज एक थोर समाजप्रबोधनकारच आहेत, असे म्हटले पाहिजे. ते ग्रामीण पद्धतीचा रंगीत फेटा, सफेद बंडी आणि सफेद धोतर परिधान करतात. समोर असणाऱ्या श्रोत्यांच्या (ग्रामीण) भाषेत बोलतात. त्यामुळे ते त्यांना आपल्यातलेच एक वाटतात. वास्तवात महाराज स्वतः बीएससी शिकलेले आहेत असे कळते. त्यांचा संतवाङ्मयाचा विशेष अभ्यास दिसतो यात शंका नाही. आपल्या कीर्तनात ते ईशभक्तीचा महिमा सांगत असले तरी समाजसुधारणेच्या मुद्द्यावरच जास्त बोलतात. गायनाचा भागही फार कमी असतो. तरीही त्यात मला तरी फारसे वावगे वाटत नाही. वक्तृत्वकलेच्या प्रांतात प्राविण्य मिळविण्यासाठी तरुणतरुणींनी कीर्तनकारांचा आदर्श नेहमी समोर ठेवावा, असे मी माझ्या लेखनातून सांगत असतो. कीर्तनकारात नृत्य, संगीत, अभिनय, स्मरणशक्ती वाक्चातुर्य, स्वरांचे आरोह, अवरोह आदी गुणसंपदा ठासून भरलेली असते. ती नवोदितांना नक्कीच आदर्श आणि अनुकरणीय असते. इंदुरीकर महाराज हेही एक आदर्श कीर्तनकार व्यक्तीमत्व आहे. प्रसंगी ते कठीण शब्दांचाही वापर करतात. ते काहींना आवडत नाही. पण काही प्रसंगी कठीण शब्द या धोंड्यांनी करितो हाणाहाण या कव्युक्तीप्रमाणेही महाराजांना करावे लागले तर त्यात अनुचित असे काय आहे? महाराज कीर्तन करता करता, श्रोत्यांशी संवाद साधता साधता मधूनच बंडीत वरून हात घालतात आणि आपल्या बगला खाजवतात. हे मात्र हिडीस, बिभत्स आणि अनुचित वाटते. तेवढे त्यांनी टाळावे, अशी त्यांना विनंती कराविशी वाटते.**

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

# राम सातपुतेंच्या हत्येचा कट रचला गेला होता

**मंत्री जयकुमार गोरेंचा दावा । कोणी कट रचला हे समोर येईलच**



**सोलापूर : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात भाजपने दैदीप्यमान विजय मिळवला असला तरी, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना साताऱ्यात आपल्या घरातील सदस्यांच्या पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. या निकालांच्या पार्श्वभूमीवर बोलताना गोरे यांनी सोलापूरमधील माळशिरसच्या राजकारणावर भाष्य करताना माजी आमदार राम सातपुते यांच्या हत्येचा कट रचला गेल्याची खळबळजनक माहिती देऊन राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. तसेच, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी गोरे यांचा उल्लेख गुंड असा करून केलेल्या टीकेला त्यांनी सडेतोड प्रत्युत्तर देत विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे.**

जयकुमार गोरे म्हणाले, जे मला गुंड म्हणत आहेत, ते सर्वात मोठे गुंड आहेत. माळशिरसमध्ये बघा कुठल्या पद्धतीचं वातावरण आहे. अनेक कार्यकर्त्यांना मारहाण झाली, ज्या पद्धतीची भाजपला मत मिळाली आहे, ते बघून भाजप कार्यकर्त्यांना मारहाण आणि दमबाजी झाली. त्याठिकाणी माजी आमदार राम सातपुते यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. त्यातून त्यांच्या खुनाचा कट होता अशी माहिती समोर येत आहे. पोलिस याचा तपास करत आहे. तसेच हा कट कोणी रचला होता ते भविष्यात पोलीस तापासात समोर येईल. याबाबत कोण गुंडा आहे? हे समोर येईलच, त्यानंतर आपण चर्चा करू असेही गोरेंनी म्हटले.

पराभव झाल्यानंतर कारण सांगण्याची मला सवय नाही, पराभव का झाला याचं विश्लेषण मी करणार नाही. मात्र, झालेला पराभव स्वीकारतो. सोलापूरकडे लक्ष होतं, त्यामुळे साताऱ्याकडे दुर्लक्ष झालं हे खरं आहे. पण, केवळ दुर्लक्ष होणे हे एकमेव पराभवाचे कारण नाही, असे म्हणत साताऱ्यात जिल्हा परिषदेला भाऊ आणि वहिनींच्या झालेल्या पराभवावर जयकुमार गोरे यांनी भाष्य केलं. तसेच, असे अनेक पराभवाचे धक्के स्वीकारलेले आहेत. या धक्क्यातून मार्ग काढून पुढे जाण्याचा नेहमी प्रयत्न करतो. राजकारणात प्रत्येक जण असा पराभव घेऊन जातो. मुख्यमंत्र्यांनी आम्हाला सांगितले आहे, पराभव हा अंतिम नसतो आणि विजय अंतिम नसतो. केवळ, आपल्या कामात सातत्य असले पाहिजे, असेही गोरेंनी म्हटले.

रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या चौकशीची मागणी केल्यानंतर त्यावर आपली भूमिका स्पष्ट करताना मंत्री जयकुमार गोरे यांनी चौकशी झालीच पाहिजे असे ठाम मत व्यक्त केले. बारामती विमान अपघाताची चौकशी सध्या सुरू असून विमानाचा ब्लॅक बॉक्स प्राप्त झाल्याने या प्रकरणातील अधिक तपशील समोर येतील, असेही त्यांनी नमूद केले. या तपासासाठी नेमकी कोणती यंत्रणा असावी, याचा निर्णय सुरक्षा एजन्सी तसेच राज्य आणि केंद्र सरकार घेतील, असे सांगत त्यांनी या संवेदनशील विषयावर अधिक भाष्य करणे तूर्तास टाळले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या अंतर्गत राजकारणावर भाष्य करताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पक्षातीलच काही लोकांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. भाजपची वाढती प्रगती आणि यश काही लोकांना पचत नसून, अशा प्रवृत्ती आजही पक्षात कार्यरत आहेत, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. हा विजय केवळ व्यक्ती म्हणून जयकुमार गोरे किंवा इतर कोणा नेत्याचा नसून, तो भाजपच्या संघटनेचा आणि निष्ठावान केडरचा असल्याचे सांगत त्यांनी विजयाचे संपूर्ण श्रेय पक्षाच्या मजबुतीला दिले.

यावेळी बोलताना त्यांनी विरोधकांनी आणि पक्षांतर्गत काही मंडळींनी आखलेल्या गुप्त रणनीतीचाही पर्दाफाश केला. पालकमंत्री अपयशी ठरल्यास काय करायचे आणि बहुमत न मिळाल्यास कोणाशी हातमिळवणी करायची, याचा पद्धतशीर प्लॅन तयार करण्यात आला होता, असा गौप्यस्फोट त्यांनी केला. पक्षापेक्षा स्वतःला मोठे सिद्ध करण्याचा आणि पक्षनेतृत्वाला बदनाम करण्याचा हा प्रयत्न कार्यकर्त्यांनी उधळून लावला. कोणत्याही आमिषाला बळी न पडता खंबीरपणे पक्षाच्या मागे उभे राहिल्याबद्दल त्यांनी कार्यकर्ते आणि जनतेचे विशेष आभार मानले.

# गोवंशीय कत्तल टोळीवर कारवाई; १८ महिन्यांसाठी जिल्हाबंदी

**नगर : प्रतिनिधी**

**राहाता तालुक्यातील ममदापुर परिसरात गोवंशीय जनावरांची अवैध कत्तल व वाहतूक करणाऱ्या टोळीविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत संपूर्ण टोळीला १८ महिन्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ मधील कलम ५५ अन्वये हे आदेश पारित केले आहेत.**

या हद्दपारीच्या कारवाईत टोळीप्रमुख फैजान जब्बार कुरेशी (शेख) (वय २५) याच्यासह मुन्तजीर मुनिर कुरेशी (२३), अब्दुलकरीम अमिर कुरेशी (५२), मुनिर अमिर कुरेशी (५६), जब्बार हसन कुरेशी (शेख) (२३), नाजीम आयुब कुरेशी (३३), वसीम आयुब कुरेशी (२७) आणि रिजवान महेबुब कुरेशी (२५, सर्व रा. कुरेशी मोहल्ला, ममदापुर, ता. राहाता) यांचा समावेश आहे.

या टोळीने संघटित स्वरूपात गुन्हेगारी कारवाया करत राहाता तालुक्यातील ममदापुर व लोणी परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. खुनाचा प्रयत्न, अवैधरित्या गोवंशीय जनावरांची वाहतूक, प्राण्यांवर क्रूरता, गोवंशीय कत्तल करून गोमांसाची वाहतूक, तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या जीवित व वैयक्तिक सुरक्षेला धोका निर्माण करणे अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये ही टोळी सराईतपणे सहभागी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सन २०२१ ते २०२५ या कालावधीत त्यांच्या विरोधात विविध गुन्हे दाखल असून, प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नव्हती. टोळीच्या वाढत्या गुंडगिरीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या दहशतीमुळे कोणीही तक्रार देण्यास किंवा साक्ष देण्यास पुढे येत नव्हते. भविष्यात आणखी गंभीर गुन्हे घडण्याची शक्यता लक्षात घेता, टोळीची पांगापांग करून त्यांना जिल्ह्याबाहेर काढणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष पोलिसांनी काढला.

लोणी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास वाघ यांनी या टोळीविरोधात हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाची उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती यांनी सखोल चौकशी करून शिफारशीसह अहवाल सादर केला. त्यानंतर पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सर्व बाबींचा विचार करून संपूर्ण टोळीला १८ महिन्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले.

संघटित गुन्हेगारीचा बिमोड करण्यासाठी जिल्ह्यात शरीराविरुद्ध, मालाविरुद्ध, गोवंशीय कायद्यांतर्गत, भारतीय हत्यार कायद्यान्वये तसेच वाळूचोरीसारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या सराईत गुन्हेगार टोळ्यांची माहिती संकलित करून त्यांच्याविरोधात कठोर कारवाई केली जात असल्याचे पोलिस अधीक्षक घार्गे यांनी स्पष्ट केले.

(पान १ वरून)

## जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचे अचानक कामबंद आंदोलन

दिवसांपासून तपासणी प्रक्रियेवरून वाद निर्माण झाला असून काही सामाजिक संघटनांकडून प्रक्रियेत त्रुटी असल्याचे आरोप करण्यात येत आहेत. यामुळे राज्यभरात या विषयाची चर्चा सुरू असून वातावरण तापले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयातील ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. संदीप कोकरे यांनी सांगितले की, गेल्या वर्षभरापासून एका सामाजिक संघटनेकडून डॉक्टरांची सातत्याने बदनामी केली जात आहे. प्रामाणिकपणे सेवा देत असताना मानसिक खच्चीकरण होत असून आम्हाला अकार्यक्षम ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजात प्रतिमा मलिन होत असल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. विनाकारण बदनामी थांबली नाही, तर सामूहिक राजीनाम्यासही तयार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

तपासणी अचानक बंद झाल्याची माहिती मिळताच रुग्णालयात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. काही दिव्यांगांनी प्रहार दिव्यांग संघटनेशी संपर्क साधून तक्रारी नोंदवल्या. अनेकांना दिवसभर थांबूनही तपासणी न झाल्याने निराश होऊन परतावे लागले. दूरवरून येण्यासाठी प्रवास खर्च, मदतनीसांची व्यवस्था करावी लागते; पुन्हा येणे कठीण असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

प्रकरणाची दखल घेत प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मणराव पोकळे यांनी रुग्णालयात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. डॉक्टरांशी चर्चा करून किमान आलेल्या दिव्यांगांची गैरसोय होऊ नये, अशी विनंती त्यांनी केली. चर्चेनंतर शंभर टक्के दिव्यांग असलेल्या व्यक्तींची तपासणी सुरू करण्यात आली; मात्र इतर दिव्यांगांची तपासणी न झाल्याने असंतोष कायम राहिला.

दरम्यान, या प्रकरणी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा शल्यचिकित्सकांशी चर्चा करून तोडगा काढण्यात येणार असल्याचे ॲड. पोकळे यांनी सांगितले. दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

## ७५७ ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीला स्थगिती

घेण्यात आला होता. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी यांनी प्रशासकांच्या नियुक्त्या केल्या होत्या. डिसेंबर २०२५ अखेर मुदत संपलेल्या ११६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका अद्याप न झाल्याने त्या ठिकाणी यापूर्वीच प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे आता आणखी ७५७ ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमले जाणार होते. या ठिकाणी कृषी, शिक्षण, पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी, पाणीपुरवठा उपअभियंता तसेच अंगणवाडी पर्यवेक्षक अशा विविध संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासकपदाची जबाबदारी देण्यात येणार होती.

मात्र, प्रशासक नियुक्तीप्रकरणी अरविंद दळवी व अन्य नागरिकांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केली. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने पुढील आदेश होईपर्यंत प्रशासक नियुक्तीची कार्यवाही न करण्याचे निर्देश दिले. या आदेशानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने निर्णय घेत मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची प्रक्रिया स्थगित केली आहे.

उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे ग्रामपंचायत पातळीवर मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून, पुढील आदेशाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणुका कधी जाहीर होणार, तसेच प्रशासक नियुक्तीबाबत पुढील दिशा काय असेल, याकडे जिल्ह्याचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

## शहाजापुरात सुझलॉन कंपनीचे स्टोअर रूम फोडले

साहित्य चोरून नेण्यात आले.घटनेची माहिती मिळताच सुपा पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. सावंत यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक हिंगसे पुढील तपास करीत आहेत. परिसरात यापूर्वीही अशा प्रकारच्या घटनांची नोंद असल्याने पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज व अन्य तांत्रिक बाबींच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## सुनेत्रा पवारांनी घेतली पंतप्रधान मोदी व गृहमंत्री शाह यांची भेट

आहे. या चर्चांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या भवितव्याबाबत, विशेषतः विलीनीकरणाच्या शक्यतांवर विचारविनिमय झाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. मागील काही दिवसांपासून पवार कुटुंबात सुरू असलेल्या बैठकींच्या मालिकेनंतर थेट भाजप नेतृत्वाशी झालेल्या या भेटींमुळे येत्या काही दिवसांत राज्याच्या राजकारणात नेमक्या कोणत्या घडामोडी घडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कलेच्या रंगांतून गुणवत्तेचा उत्सव

## निघोजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

निघोज : प्रतिनिधी

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज येथे ७ फेब्रुवारी रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व विविध गुणदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ देणारा हा कार्यक्रम रसिक प्रेक्षकांसाठी पर्वणी ठरला.



### दीपप्रज्वलनाने शुभारंभ

कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी तसेच सचिन वराळ पाटील उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

### बहारदार सांस्कृतिक सादरीकरण

गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मराठी-हिंदी गीते, नृत्य, मराठी लावणी, पोवाडा, खंडोबाचा जागरण-गोंधळ, वाघ्या-मुरळी नृत्य, देवीचा गोंधळ तसेच नाट्यप्रयोग अशा विविध कला प्रकारांनी रंगत वाढविली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

### कळमकर यांचे भावनिक विचार

प्रमुख पाहुणे संजय कळमकर यांनी आई-वडिलांचे संस्कार, आईचे महत्त्व, बालपणीच्या आठवणी व आत्मचरित्राचा परिचय करून दिला. गुरुजींनी दिलेल्या संस्कारातून कवी कसे घडतात, मोबाईल चॅटिंगमुळे होणारे धोके, जीवनातील नातेसंबंध, प्रेमकथा व विनोद निर्मिती यावर त्यांनी उदाहरणांसह मार्गदर्शन केले. विनाअनुदानित महाविद्यालयेही शंभर टक्के गुणवत्ता देत असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले.

### गुणवंतांचा गौरव

शैक्षणिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. तसेच संशोधनात्मक कार्यासाठी डॉ. मनीषा गाडीलकर, डॉ. गोरक्ष घोलप, डॉ. पोपट पठारे, प्रा. अक्षय आडसूळ, प्रा. संगीता मांडगे, प्रा. स्वाती मोरे व प्रा. धनराज तिखट यांना सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.

### प्राचार्यांचे मार्गदर्शन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी केले. अल्पावधीत महाविद्यालयाने केलेली प्रगती, गुणवत्ता व शिस्त यांचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने परिश्रम करण्याचे आवाहन केले. प्राध्यापिका संगीता मांडगे यांनी प्रभावी अहवाल वाचन करून महाविद्यालयाच्या उपक्रमांची माहिती दिली.

### मान्यवरांचे मार्गदर्शन

डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी प्राध्यापक व प्राचार्यांच्या सहकार्यामुळे विनाअनुदानित महाविद्यालयांनी उंच भरारी घेतल्याचे सांगितले. अहवाल वाचन, विविध डे आणि पारितोषिके विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सचिन वराळ पाटील यांनी ग्रामीण भागात महाविद्यालय सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाल्याचे सांगून भविष्यात अधिक उपक्रम राबविण्याच्या शुभेच्छा दिल्या.

**यशस्वी संयोजन** कार्यक्रमासाठी प्रा. सचिन निघूट, डॉ. गोरक्ष घोलप, प्रा. सुरेश गाडीलकर यांच्यासह सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा. अशोक कवडे व प्रा. निलीमा घुले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी केले, तर आभार डॉ. पोपट पठारे यांनी मानले. समारोपप्रसंगी उपप्राचार्य डॉ. मनीषा गाडीलकर यांचे प्रास्ताविक, अध्यक्षीय मार्गदर्शन प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांचे झाले आणि प्राध्यापिका संगीता मांडगे यांनी आभार मानले. या सोहळ्यासाठी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी भाषेच्या गौरवाचा उत्सव

## कुरुंद येथे कवी संमेलन व व्याख्यानमाला

कुरुंद : प्रतिनिधी

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त संजीवनी प्रतिष्ठान इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्निक तसेच संजीवनी प्रतिष्ठान कॉलेज ऑफ एज्युकेशन, कुरुंद येथे दि. ४ जानेवारी रोजी 'मराठी कवी संमेलन व व्याख्यानमाला' हा उपक्रम अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. मराठी भाषेचा अभिमान, साहित्याची समृद्ध परंपरा आणि आधुनिक काळातील तिचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.



### दीपप्रज्वलनाने सुरुवात

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. संदीप जाधव यांनी प्रास्ताविकातून मराठी भाषेचे महत्त्व, तिची सांस्कृतिक परंपरा आणि आजच्या पिढीमध्ये मराठीचा प्रभावी वापर करण्याची गरज यावर सविस्तर भूमिका मांडली. अध्यक्षीय व प्रमुख पाहुण्यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

### कवितांचा बहार

कवी संमेलनात डॉ. प्रवीण जाधव, डॉ. हरेश शेळके, संजय पठाडे आणि गीतांजली वाबळे यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच देशभक्तीपर कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनीही स्वलिखित कविता व अभिवाचनातून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित प्रेक्षकांकडून भरभरून दाद मिळाली.

### व्याख्यानमालेत मार्गदर्शन

व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते ॲड. बाबुराव पाचंगे, ज्येष्ठ पत्रकार नितीन बारवकर, व्याख्याते रावसाहेब चक्रे, दीपक वाघमारे, शपोपटराव पाचंगे व सागर रोकडे यांनी मराठी भाषा व साहित्याचा प्रवास, आधुनिक काळातील मराठीची भूमिका तसेच तंत्रज्ञानाच्या युगात मराठीचा प्रभावी वापर यावर सखोल मार्गदर्शन केले. या व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा व प्रेरणा मिळाली.

### मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. डी. कापसे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी शेटे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुबक व प्रभावी सूत्रसंचालन प्रा. विश्वप्रतिमा घुमरे व प्रा. अलका रुपनर यांनी केले.

### संस्थेचे कौतुक

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या उद्देशाला अनुसरून आयोजित केलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल अभिमान, प्रेम आणि जाणीव निर्माण करणारा ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. भावना वाघमारे, प्रा. शुभांगी वाघमारे, प्रा. रोहिणी वाघमारे, प्रा. अनुराधा साळवे, प्रा. तृप्ती चव्हाण, प्रा. नीता साळुंके, प्रा. शीतल गायकवाड, प्रा. ऋषिकेष दुडे, लहू गायकवाड, काळे सर, कर्डीले सर, आयोजन समिती व सर्व सहकाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

### आयोजकांचे विशेष आभार

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संजीवनी प्रतिष्ठान, मुंबई संस्थेचे सचिव सर्फराज पठाण, संस्थेच्या खजिनदार सुमनताई शेळके, जी. एस. महानगर बँकेच्या अध्यक्ष व अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या संचालिका गीतांजलीताई शेळके तसेच प्रसिद्ध उद्योजिका स्मिता शेळके यांनी विशेष कौतुक केले. उपस्थित सर्वांचे आभार प्रा. सुप्रिया वाळुंज यांनी मानले.

# पुस्तकवाचनातून घडते सुजाण पिढी

## शहाजापुरात विद्यार्थ्यांचा गौरव | वाचन हेच ज्ञानाचे सर्वोत्तम साधन

शहाजापुर : प्रतिनिधी

पुस्तकवाचनातून मिळणारे ज्ञान हे सर्वोत्तम असते. वाचनामुळेच समृद्ध आणि सुजाण पिढी घडते. आम्हीही वाचनाच्या बळावरच अधिकारी होऊ शकलो, असे प्रतिपादन सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती गडकरी यांनी केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त शहाजापुर येथील कौडेश्वर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित निबंध व चित्ररंगवा स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात त्या बोलत होत्या.




### वाचनाची गोडी महत्त्वाची

जिल्हा परिषद शाळेत मिळालेले मूलभूत ज्ञान आणि शालेय जीवनात लागलेली वाचनाची गोडी आयुष्याला यशाच्या दिशेने घेऊन जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचावीत. मराठी भाषेची गोडी निर्माण झाली, की वाचनाची आवड आपोआप वाढत जाते, असेही गडकरी यांनी सांगितले.शहाजापुरसारख्या छोट्या गावात समृद्ध ग्रंथालय उपलब्ध असणे ही अभिमानाची बाब असून विद्यार्थ्यांनी येथे आवर्जून येऊन पुस्तके हाताळावीत, असे आवाहन त्यांनी केले. टीव्ही आणि मोबाईलचा अतिवापर टाळून वाचनाची सवय लावण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

### विजेत्यांचा गौरव

कौडेश्वर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेत कु. आदिती दीपक म्हस्के हिने प्रथम, कु. आदिती अंकुश म्हस्के हिने द्वितीय, तर प्रेमराज मच्छिंद्र जाधव याने तृतीय क्रमांक पटकावला. चित्र रंगवा स्पर्धेत आयुष संतोष सकट याने प्रथम, कु. तन्वी प्रमोद म्हस्के हिने द्वितीय, तर श्रेयश चिंतामण बेंद्रे याने तृतीय क्रमांक मिळविला. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुस्तक व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

### कार्यक्रमाची रूपरेषा

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कौडेश्वर ग्रंथालयाचे ग्रंथपाल सुरेंद्र शिंदे यांनी प्रस्तावना करून कार्यक्रमाचा उद्देश विशद केला. सरपंच सौ. संगिता मोटे यांनी पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी व पीएसआय शिवले यांचे स्वागत केले.

### उपस्थित मान्यवर

यावेळी माजी सरपंच अण्णासाहेब मोटे, माजी ग्रामपंचायत सदस्य विशाल सकट, अर्चना हंडोरे, रावसाहेब मोटे, जगन्नाथ सकट, आकाश मोटे, उत्तम सकट, शिवाजी मोटे, मोरे मॅडम तसेच पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण पवार यांनी केले, तर आभार तलोरे मॅडम यांनी मानले.

# पिंपळगाव रोठ्यात महाशिवरात्री महोत्सव

## महारुद्राभिषेक, किर्तन व फराळ महाप्रसाद

पिंपळगावरोठा : प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळगावरोठा येथील गावठाणातील पुरातन श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीचा पवित्र महोत्सव रविवार, १५ फेब्रुवारी रोजी समस्त ग्रामस्थांच्या नियोजनातून भक्तिभावात संपन्न होणार आहे. किर्तन, अभिषेक, महापूजा, आरती आणि फराळ महाप्रसाद अशा धार्मिक कार्यक्रमांची दिवसभर रेलचेल राहणार आहे.



### सूर्यकिरणांचा अलौकिक योग

या पुरातन मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वाभिमुख असलेल्या मंदिरात सकाळच्या पहिल्या सूर्यकिरणांचा थेट महादेवाच्या पिंडीवर होणारा स्पर्श. हा अलौकिक योग पाहण्यासाठी दरवर्षी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

### जीर्णोद्धाराची ऐतिहासिक परंपरा

छोटेखानी पण श्रद्धेचा मोठा वारसा जपणाऱ्या या मंदिराचा जीर्णोद्धार व कलशारोहण सोहळा सन २००४ मध्ये विश्वगौरव विभूषित महान तपस्वी प.पू. स्वामी गगनगिरी महाराज आणि राष्ट्रसंत भैय्युजी महाराज (इंदोर, मध्यप्रदेश) यांच्या शुभहस्ते पार पडला होता. त्या काळापासून मंदिरातील धार्मिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात साजरे केले जात आहेत.

### धार्मिक कार्यक्रम

महाशिवरात्री निमित्त सकाळी ६ वाजता महारुद्राभिषेक, महापूजा व महाआरती होणार आहे. सकाळी १० वाजता संगमनेर येथील गायनाचार्य ह.भ.प. उज्वलाताई महाराज वाकळे यांचे शिवमाहात्म्यावर कीर्तन सेवा होईल. ही कीर्तन सेवा सन २००४ पासून सालाबादप्रमाणे श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानचे माजी अध्यक्ष ॲड. पांडुरंग गायकवाड यांच्या मातोश्री कै. सौ. उल्हासाबाई विठ्ठल गायकवाड यांच्या स्मरणार्थ बिदागीतून दिली जाते.

### फराळ महाप्रसाद

दुपारी १२ वाजता साबुदाणा खिचडी व केळीचा फराळ महाप्रसाद भाविकांना पंगतीतून दिला जाणार आहे. या महाप्रसादासाठी पिंपळगावरोठा गावातील भाविक साबुदाणा, शेंगदाणे, मिरची, तेल, केळी आदी वस्तूरूप दान स्वेच्छेने देत असतात. सर्वांच्या योगदानातून व सेवाभावातून दरवर्षी भव्य अन्नदानाचा सोहळा साकारतो.

### सेवाभावाचे व्यापक सहकार्य

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी, जय मल्हार विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारीवृंद, जय गगनगिरी सेवाभावी मंडळ, गावातील भजनी मंडळे, तरुण मंडळे तसेच मुंबईपुणेकर ग्रामस्थांचे सहकार्य लाभत आहे.

### प्रमुख मान्यवर

समाजरत्न दानशूर डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) आणि पारनेर तालुक्याचे समाजभूषण, श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानचे माजी अध्यक्ष ॲड. पांडुरंग गायकवाड.

### हजारो भाविकांची उपस्थिती अपेक्षित

महाशिवरात्रीच्या दिवशी महिला-भगिनी, पुरुष, वयोवृद्ध, तरुण-तरुणी असे सर्वजण शिवनामस्मरणात दंग होऊन दर्शन, कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घेतात. या पवित्र सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान व महोत्सव नियोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# राजयोगाने जीवनात शांती, आनंद व सकारात्मकता

## साधना दिदी यांचे प्रतिपादन



सुपा : प्रतिनिधी

"राजयोगाच्या नियमित अभ्यासाने मानवी जीवनात आमूलाग्र सकारात्मक बदल घडतात. यामुळे केवळ वैयक्तिक जीवन सुधारत नाही, तर संपूर्ण जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलतो. मनात शांती, विचारात स्पष्टता आणि जीवनात आनंद निर्माण होतो," असे प्रतिपादन ब्रह्मकुमारी साधना दिदी यांनी केले.

### महाशिवरात्री व शिवबाबा अवतरण सोहळा

सुपा येथील ब्रह्मकुमारी गीता पाठशाळेत आयोजित महाशिवरात्री उत्सव आणि शिवबाबांच्या ९० व्या अवतरण सोहळ्यानिमित्त त्या बोलत होत्या. हा कार्यक्रम अत्यंत भक्तिमय, शांत आणि मंगलमय वातावरणात पार पडला.

### मुरली कथनाने सुरुवात

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे पारनेर सेंटरच्या संचालिका साधना दिदी यांच्या हस्ते 'मुरली' कथनाने झाली. मुरलीच्या माध्यमातून त्यांनी राजयोगाचे महत्त्व, आत्मिक शुद्धीकरण आणि जीवनातील मूल्यांची जाणीव करून दिली.

### शिवध्वज पूजन व ध्वजारोहण

यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवध्वजाचे विधिवत पूजन करण्यात आले. ध्वजारोहण सोहळ्यावेळी परिसरात 'ओम शांती'चा जयघोष होत शिवभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

### मान्यवरांची उपस्थिती

या प्रसंगी सुपा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सागर मैड, देवराम भाई ढोले, अमोल मैड, प्रतिमा माताजी, सुमन ढोले, दिलीप थोरे, लक्ष्मण गवळी, मीना मेमाणे, रामदास भाई, राम भाई, पार्वती माता, सुषमा माता, कदम भाई, मोकाते भाई यांच्यासह परिसरातील असंख्य ब्रह्मकुमारी अनुयायी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाप्रसादाने सांगता

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. उपस्थित सर्वांना महाप्रसादाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्यामुळे सुपा परिसरात आध्यात्मिक चैतन्य आणि सकारात्मक ऊर्जेचे वातावरण अनुभवायला मिळाले.

# कै. शेळके यांच्या कार्यस्मृतींना पिंपरीमध्ये आदरांजली

## ग्रामीण बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालयात पुण्यतिथी

पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

पिंपरी जलसेन येथील ग्रामीण बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालयात कै. उदयराव गुलाबराव शेळके यांची तृतीय पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय शेटीया हे उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत दादाभाऊ बोरूडे यांनी केले.



### जिल्ह्याच्या जडणघडणीत मोलाचा वाटा

कार्यक्रमात बोलताना माजी सरपंच लहू थोरात यांनी कै. उदयराव शेळके यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. गावाच्या विकासाबरोबरच अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या जडणघडणीत दादांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावून ठसा उमटवला, असे त्यांनी सांगितले. दादा मुंबईत वास्तव्यास असतानाही आपल्या गावाच्या विकासाकडे त्यांचे सातत्याने लक्ष होते, अशी आठवण त्यांनी उपस्थितांना करून दिली.

### परंपरा पुढे नेणारी वाटचाल

कै. उदयराव शेळके यांच्या पश्चात श्रीमती गीतांजलीताई शेळके या गावाच्या प्रत्येक विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत असून, त्या सामाजिक बांधिलकीची परंपरा पुढे नेत आहेत, असेही श्री. थोरात यांनी नमूद केले.

### मान्यवरांची उपस्थिती

यावेळी गावचे सरपंच सुरेश काळे, उपसरपंच भाऊसाहेब पानमंद यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच तंटामुक्ती अध्यक्ष अभिमन्यू थोरात, शाखा व्यवस्थापक निवृत्ती अडसरे, रामदास शेळके, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन विठ्ठल अडसरे, ज्ञानदेव वाढवणे, अंबादास काळे, भाऊ घेमुड, श्रावण रणदिवे, फक्कड शेळके, कुंडलिक बोरुडे, साहेब गणेश पुणेकर, लैला शेख यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमिक शिक्षक व बँकेचे संचालक श्री. विजय पठारे यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्री. चंदशेखर ठुबे सर यांनी मानले. या कार्यक्रमातून कै. उदयराव शेळके यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाला उपस्थितांनी भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

# एक्सलेंट ऑलिम्पियाडमध्ये ब्लूमिंग बडस् प्रशालेचे यश

## राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांची घवघवीत कामगिरी

सुपा : प्रतिनिधी

तालुक्यातील नारायणगव्हाण येथील ब्लूमिंग बडस् इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या राष्ट्रीय स्तरावरील एक्सलेंट ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा तसेच संपूर्ण परिसराचा नावलौकिक वाढवला आहे. विविध विषयांतील या प्रतिष्ठित स्पर्धात्मक परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत उच्च श्रेणी प्राप्त केल्या असून, शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा ठाम प्रचिती दिली आहे.



### गुणवत्तेची मोहोर

एक्सलेंट ऑलिम्पियाड परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा, विश्लेषणात्मक विचारशक्तीचा आणि विषयातील सखोल आकलनाचा कस पाहणारी मान्यताप्राप्त राष्ट्रीय परीक्षा मानली जाते. जिल्ह्यातून हजारो विद्यार्थी या परीक्षेत सहभागी होत असताना, ब्लूमिंग बडस् प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक वातावरणात आपली वेगळी ओळख निर्माण करत उल्लेखनीय कामगिरी केली.

### गणितासह विविध विषयांत प्राविण्य

गणित, बुद्धिमत्ता, इंग्रजी आणि जनरल नॉलेज या विषयांमध्ये विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील गुणवंत यादीत स्थान पटकावून शाळेच्या यशात भर घातली.

### मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा

या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य कारणीभूत ठरले असल्याचे शाळा व्यवस्थापनाने स्पष्ट केले. विद्यार्थ्यांसाठी विशेष सराव चाचण्या, प्रश्नसंचांचा सखोल सराव आणि संकल्पनाधारित अध्यापन पद्धती राबविण्यात आल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि त्याचे सकारात्मक परिणाम परीक्षेत दिसून आले.

### स्पर्धात्मक युगासाठी विद्यार्थ्यांची तयारी

"स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ शालेय अभ्यासापुरते मर्यादित न राहता विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. अशा परीक्षांमुळे आत्मविश्वास वाढतो, ज्ञानाची व्याप्ती विस्तारते आणि भविष्यातील मोठ्या स्पर्धांसाठी भक्कम पाया तयार होतो," असे मत मुख्याध्यापिका सौ. प्रीतीलता हांडे यांनी व्यक्त केले. शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी एक्सलेंट ऑलिम्पियाड, शिष्यवृत्ती परीक्षा, मंथन, ग्रामर परीक्षा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विज्ञान प्रकल्प, वाचन उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम सातत्याने राबवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

### पालक आणि विद्यार्थ्यांचा आनंद

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल पालकांनीही आनंद व्यक्त करत शाळेच्या शैक्षणिक दर्जाचे आणि शिक्षकांच्या परिश्रमांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध झाल्याने मोठ्या संधी मिळत असल्याचे पालकांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही आपल्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यात आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करण्याचा निर्धार व्यक्त केला. ब्लूमिंग बडस् प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ शाळेसाठीच नव्हे, तर संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद ठरले आहे. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांकडे वळण्याची प्रेरणा मिळणार असून, आगामी काळातही विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शाळेचे नाव उज्ज्वल करतील, अशी अपेक्षा शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com